श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मार्च २०२४ | वर्ष – १२, अंक – ३ | मासिक, पाने १२ | Regn. no. - MAHMAR/2022/86035

## उद्योजक श्री. नरेंद्र काळे यांचे डेरवण येथे विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान



*श्री. नरेंद्र काळे मुलांशी संवाद साधताना*

दि. २५ जानेवारी रोजी सर्जक उद्योजक श्री. नरेंद्र काळे यांनी डेरवण इंग्लिश मिडियम शाळेच्या विद्यार्थ्यांसमोर 'सर्जनशीलता आणि उद्योजकता' या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

'प्रत्येक महान व्यवसायाची सुरुवात स्वप्नाने होते!' या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी सुविचाराने सुरुवात करून, विद्यार्थ्यांना संबोधित करताना श्री. नरेंद्र काळे म्हणाले, मी नेहमी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा संदर्भ घेतो; कारण ते माझ्यासाठी वैयक्तिक प्रेरणा आहेत. नवनिर्मिती ही दूरदृष्टीने पाहिलेल्या एका स्वप्नापासून सुरू होते. स्वप्नांना सत्यात उतरविण्याचे ध्येय आणि अथक परिश्रम करण्याची क्षमता म्हणजेच उद्यमशीलता. तुमच्या नवनिर्मितीमुळे जर भविष्यात चांगले बदल घडून येणार असतील तर तुम्ही त्वरित यशाच्या राजमार्गावर चालू लागता. तुमची उत्पादने किंवा सेवा तुम्ही किती प्रभावीपणे जगासमोर ठेवता हे महत्त्वाचे असते.

उद्योजकतेची व्याख्या ही केवळ व्यवसाय सुरू करणे नाही तर समस्या सोडवणे आहे. उद्योजकाची मुख्य गुणवत्ता म्हणजे समस्या निराकरण क्षमता आणि धैर्य होय. केवळ समस्यांची उकल करणे पुरेसे नाही तर आपण शोधून काढलेले उपाय परिणामकारक असणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून इतरांचे जीवन कालच्यापेक्षा आज अधिक सुखकर होईल.

ते पुढे म्हणाले, इस्रायलमध्ये इयत्ता दुसरीपासून वयाच्या ७-८व्या वर्षी, नवनिर्मिती आणि उद्योजकता विद्यार्थ्यांमध्ये बिंबवतात. तुम्हीदेखील एखाद्या कल्पनेचा विचार करू शकता, एक नावीन्यपूर्ण उपाय शोधू शकता. उद्योजकता म्हणजे काय? तर संसाधनांच्या उपलब्धतेची काळजी न करता संधी ओळखता आली पाहिजे. यशस्वी उद्योजक तो असतो जो त्याच्याकडे असलेल्या संसाधनांवर काम करतो आणि जादू घडवून आणतो. हेच उद्योजकतेचे सौंदर्य आहे. तुमच्याकडे पैसा, शिक्षण आणि त्या प्रमाणात टॅलेंट नसेलही, पण जर तुमच्याकडे योग्य स्वप्ने, आवड आणि धैर्य असेल तर तुम्ही नक्कीच यशस्वी होता. उद्योजकता संपूर्ण प्रदेशाचा कायापालट करू शकते.

उद्योजकता दोन प्रकारची असते – योग्य कामांवर खर्च करण्यासाठी संपत्ती निर्मिती (व्यावसायिक उपक्रम) आणि निर्माण केलेल्या संपत्तीतून कल्याणकारी निर्मिती (सामाजिक उपक्रम). उद्योजकतेचा प्रवास ध्येयावर केंद्रित असावा, अनेक विचलित करणारे प्रसंग येऊ शकतात; परंतु त्यावर मात करत आपण नवनिर्मितीच्या प्रवासाचा आनंद घ्यावा. जर आपला हेतू योग्य असेल तर यश आनुषंगिक आहे, पैसा आपल्या मागे येतो. पैसे कमावण्यासाठी नवनिर्मिती करणे चुकीचे आहे, आपण नवनिर्मिती केली पाहिजे कारण आपल्याला जग बदलायचे आहे.

आपण अशा जगात जगत आहोत जे खूप रोमांचक आहे. आत्ताचा काळ सर्वोत्तम आहे; तसेच तो सर्वांत वाईट आहे. आपण दहशतवाद, युद्धे आणि महामारी – अशा सर्वांत वाईट गोष्टी पाहत आहोत. त्याच वेळी आपण चार क्रांतींमध्ये जगत आहोत Artificial Intelligence, Digital Innovation, Internet, Entrepreneurial Revolution. तुमची पिढी भाग्यवान आहे की या सर्व चार क्रांती एकत्र आल्या आहेत जे खूप अद्वितीय आहे. Artificial Intelligence माणसांची जागा घेणार नाही; ते मनुष्यासारखे बुद्धिमान व सर्जनशील नाही; ते आपण करत असलेल्या यांत्रिक गोष्टींची जागा घेईल; परंतु जोपर्यंत आपण आपली सर्जनशीलता जिवंत ठेऊ तोपर्यंत ते नोकऱ्या नष्ट करणार नाही.

तुमच्याकडे पैसा, इतर संसाधने, असो वा नसोत, मात्र इंटरनेट, मोबाइल आणि 'AI'मुळे माहितीची संपत्ती आणि मनोरंजक गोष्टी तुमच्यासाठी उपलब्ध आहेत. हे महान तुल्यबळ आहे. नवोन्मेष आणि उद्योजकता प्रवास सुरू करण्यासाठी ही उत्तम वेळ आहे. जेव्हा तुम्ही तुमचा व्यवसाय सुरू कराल तेव्हा सर्वात आधी विचार करा की कोणीतरी माझे उत्पादन किंवा सेवा खरेदी करेल का? संधी मोजण्यासाठी बाजारातील मागणी आणि त्या मागणीत होणारी वाढ हा महत्त्वाचा घटक आहे. संधी म्हणजे समाजाच्या अपूर्ण गरजा शोधणे.


मला नेहमी तरुण पिढीशी उद्योजकतेबद्दल बोलायला आवडते आणि म्हणूनच 'भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ इनोव्हेशन अँड आंत्रप्रन्योरशिप अँड लीडरशिप', कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे येथे सुरू केले. त्या संस्थेतून अनेक स्टार्टअप सुरू झाले आहेत आणि उद्योजकतेचा कोर्स केल्यानंतर एक २१ वर्षांची मुलगी म्हणाली की आधी तिला स्वत:साठी सर्वोत्तम नोकरी मिळवायची होती पण हा कोर्स केल्यानंतर तिला इतरांसाठी सर्वोत्तम नोकऱ्या निर्माण करायच्या आहेत. ती एक यशस्वी उद्योजिका आहे. आत्तापर्यंत १०००हून अधिक उद्योजक त्या संस्थेतून निर्माण झाले आहेत. कोर्सच्या सुरुवातीला मुलांमध्ये भित्रेपणा होता, आत्मविश्वास नव्हता, आपली मतं व्यक्त करू शकत नव्हते, पण अभ्यासक्रमाच्या शेवटी तीच मुले प्रचंड आत्मविश्वास आणि उत्कृष्ट सादरीकरण कौशल्याने आपल्या व्यवसाय योजना ठामपणे मांडू शकतात.

उद्योजकतेच्या नावीन्यपूर्ण कल्पनेच्या पाच किल्ल्या आहेत – मी काय करणार आहे, कोणासाठी, का, कसे आणि कुठे? जर तुम्ही पाचही प्रश्नांची उत्तरे दिलीत आणि स्वप्न साकार करण्याचे धाडस केलेत तर तुम्ही उद्योजक म्हणून यशस्वी व्हाल. तसेच RAMA's syndrome प्रमाणे Reject (नाकारणे), Annoy (चिडवणे), Mull over (विचार करणे) आणि शेवटी Accept (स्वीकारणे) अशी प्रत्येक कल्पना या नाकारण्याच्या प्रक्रियेतून जाईल आणि शेवटी स्वीकारली जाईल. तुम्ही काय, केव्हा, कसे, कधी, कुणासाठी करणार आहात, हा तुमचा बिझनेस प्लॅन तुम्हाला जगासमोर घोषित करावा लागेल. याने दोन गोष्टी घडतात, एक तुम्ही त्यासाठी वचनबद्ध राहता आणि दुसरे तुम्ही जे काही केले आहे त्याबद्दल जग तुमची दखल घेते.

मुले कोणत्याही पूर्वग्रहांशिवाय विचार करू शकतात, हीच त्यांच्याकडे असलेली सर्वात मोठी संपत्ती आहे. त्यांना अपयशांना सामोरे जावे लागत नाही, सर्वकाही त्यांच्यासाठी अत्यंत आशावादी असते आणि तिथेच सर्जनशीलता स्वत:चा आकार घेते आणि त्यात मोठी क्षमता असते.

एका बारा वर्षांच्या मुलाने प्रश्न विचारल्यावर उत्तर देणारे ॲप तयार करून स्वत:ची कंपनी स्थापन केल्याचा व्हिडिओ दाखवून, विद्यार्थी जर काहीतरी नवीन करण्याची स्वप्ने पाहत असतील तर त्यांनी ती विसरू नयेत, ती साकार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी आणि डेरवण शाळेतील किमान १०० विद्यार्थ्यांची उद्योजक म्हणून ओळख असावी अशी मनीषा श्री. नरेंद्र काळे यांनी व्यक्त केली.

श्री. नरेंद्र काळे यांनी समारोप करताना विद्यार्थ्यांना येथे उपलब्ध असलेल्या सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून निर्भयपणे स्वप्न पाहा, अपयश स्वीकारा, जिज्ञासू व्हा, कठोर आणि बुद्धिचातुर्याने काम करा, लवचिकता निर्माण करा, मार्गदर्शन मिळवा, उत्कट राहा, जगाला बदलण्याची ताकद व्हा असा संदेश दिला.



# श्रीबाबामहाराज सहस्त्रबुद्धे समाधिमंदिरात दशग्रंथ पारायण



*ऋग्वेद संहिता पारायण*



*ऐतरेय ब्राह्मण आणि ऐतरेय आरण्यक पारायण*

श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात माघ शुद्ध द्वादशी ते पौर्णिमा, शक १९४५; बुधवार, दि. २१ फेब्रुवारी ते शनिवार दि. २४ फेब्रुवारी २०२४ या काळात दशग्रंथ पारायण करण्यात आले. वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या पारायणात एकूण २७ विद्वान ब्राह्मण सहभागी झाले होते. त्यांची नावे खालीलप्रमाणे :

वे.मू. वसंतराव फडके, वे.मू. योगेश्वर बोरकर, वे.मू. स्वानंद धायगुडे, वे.मू. रामचंद्र मुंडले, वे.मू. माधव परांजपे, वे.मू. अथर्व पटवर्धन, वे.मू. मनोज जोगळेकर, वे.मू. नारायण मुरवणे, वे.मू. गिरीश मुंडले, वे.मू. हृषीकेश जोशी, वे.मू. विनायक रबडे, वे.मू. विनायक दाणी, वे.मू. राजेंद्र दाणी, वे.मू. भूषण केळकर, वे.मू. मंदार पुजारी, वे.मू. अभिषेक टेंगसे, वे.मू. हृषीकेश करंबेळकर, वे.मू. चिन्मय जोशी, वे.मू. पुरुषोत्तम पंढरपुरे, वे.मू. मनीष पटवर्धन, वे.मू. समीर मिराशी, वे.मू. सुशील पाटील, वे.मू. सिद्धांत जोशी, वे.मू. मंदार क्षीरसागर, वे.मू. श्रीराम जोशी, वे.मू. प्रथमेश पुरोहित, वे.मू. पुरुषोत्तम वझे,

आज विश्वामध्ये प्राचीन वाङ्मय म्हणून जर कोणते असेल तर ते वेद हे आहेत. ह्या वेदांमध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व



*ऋग्वेद षडङ्ग पारायण*

अथर्ववेद असे चार वेद आहेत. यामध्ये ऋग्वेद हा प्रधान वेद आहे. ह्याच ऋग्वेदामध्ये संहिता, ऐतरेय ब्राह्मणम्, ऐतरेय आरण्यक, आश्वलायन श्रौतसूत्र, गृह्यसूत्र, निरुक्त, पाणिनीय शिक्षा, ज्योतिष, छंद, व्याकरण किंवा अष्टाध्यायी हे ग्रंथ मिळून दशग्रंथ तयार होतात.

संहिता : संहिता याचा अर्थ अनेक मंत्रांचे, सूक्त इत्यादींचे एकत्रीकरण किंवा मूळ मंत्र विभाग असा होतो. ह्या संहितेमध्ये ६४ अध्यायांमध्ये १०५५२ मंत्र असून महर्षी वेदव्यासांनी याची विभागणी १० मंडल व ८ अष्टक या पद्धतीने केलेली आहे.

ऐतरेय ब्राह्मणम् : प्रत्येक वेदामध्ये ब्राह्मण ग्रंथ असून हे त्या त्या वेदांबद्दल भाष्य करतात. यज्ञ करताना कोणती काळजी घ्यावी हे ह्या ग्रंथांमध्ये सांगितलेले आहे.

ऐतरेय आरण्यक : अरण्यात जाऊन करण्याची महाव्रते सांगितलेली आहेत, तसेच हा ग्रंथ तत्त्वज्ञानावरसुद्धा प्रकाश टाकतो. ह्याला ऋग्वेदाचे उपनिषदसुद्धा म्हटले जाते.

षडङ्ग (उपग्रंथ) : *छन्दःपादौतुवेदस्य हस्तौकल्पोथपठ्यते । ज्योतिषामयनंचक्षुः निरुक्तंश्रोत्रमुच्यते ।। शिक्षाघ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम् । तस्मात्साङ्गमधीत्येव ब्रह्मलोके महीयते ।।*
('छन्द' हे वेदाचे दोन पाय तर 'कल्प' हे दोन हात आहेत. 'ज्योतिष' हे दोन डोळे तर 'निरुक्त' हे दोन कान आहेत. 'शिक्षा' हे वेदाचे नाक आहे, तर 'व्याकरण' हे मुख आहे.)

ऋग्वेद षडङ्ग पारायणात खालील ग्रंथ आहेत :

आश्वलायन श्रौतसूत्र : वेदांमधील कोणत्या मंत्रांनी कोणत्या देवतेला उद्देशून आहुती द्यावी, तसेच वेगवेगळे इष्टी प्रयोग या ग्रंथांमध्ये दिलेली आहेत. यज्ञयागादी कर्मामध्ये काही मंत्र-तंत्र चुकले तर काय प्रायश्चित्त घ्यावे याची माहिती या ग्रंथामध्ये आहे.

आश्वलायन गृह्यसूत्र : ह्या ग्रंथामध्ये विवाह, उपनयन समावर्तन, अंत्येष्टी ह्या गोष्टींना लागणाऱ्या मंत्रांची माहिती, हे प्रयोग कसे करावेत याची माहिती आहे. तसेच सप्तपाक संस्था इत्यादींची

माहिती आहे.

निरुक्त : या ग्रंथांमध्ये वैदिक मंत्रांची व्याख्या, शब्दांची व्युत्पत्ती एकाच धातूचे अनेक अर्थ होतात; त्यापैकी एक अर्थ सिद्ध करणे, निरुक्ताचाच एक भाग असलेल्या निघंटु या ग्रंथामध्ये एकाच शब्दाचे अनेक समानार्थी शब्द आलेले आहेत.

पाणिनीय शिक्षा : ह्या ग्रंथामध्ये वेदमंत्र कसे उच्चारण करावे, विसर्ग, अनुस्वार, दीर्घ-ह्रस्व अक्षरे उत्तमरीत्या कसे पठण करावे याची माहिती आहे. योग्य सस्वर मंत्रपठणाने काय फायदा होतो तसेच अशुद्ध म्हंटल्याने त्याचे काय परिणाम होतात हे या ग्रंथांमधून कळते.

ज्योतिष : या ग्रंथामध्ये प्रामुख्याने मुहूर्त विचार तसेच खगोल विचार, नक्षत्र आणि त्यांच्या देवता यांची माहिती मिळते.

छंद : आपण अनेक मंत्र, सूक्त, श्लोक, स्तोत्रे, सुभाषिते इत्यादी ऐकतो किंवा पठण करतो; त्या सर्वांची रचना ठराविक अक्षर संख्येमध्ये विविध तालासुरामध्ये आहे किंवा लयबद्ध आहेत, या सर्वांची माहिती छंद या ग्रंथामध्ये आहे.

अष्टाध्यायी (व्याकरण) : ह्या ग्रंथामध्ये वेदमंत्रासंबंधी व्याकरण आलेले आहे. उदा. एखादे अक्षर ह्रस्व का झाले किंवा दीर्घ का झाले तसेच विसर्ग, स्वरसंधी, व्यंजनसंधी इत्यादींची माहिती सूत्ररूपाने आलेली आहे

## श्रीसहस्रबुद्धे समाधिमंदिरात 'उत्तरम्' शिलेचा पूजन समारंभ

श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे आणि त्यांचे सच्छिष्य श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामीमहाराज यांच्या शिवाजीनगर, पुणे येथील समाधिमंदिरांच्या पुनर्निर्माणाच्या कार्याचा प्रारंभ विधिवत पद्धतीने सोमवार, दि. ४ सप्टेंबर, २०२३ आणि गुरुवार दि. ७ सप्टेंबर २०२३ या दिवशी प्रात:काली झाला आणि सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०२३ रोजी दोन्ही मंदिरांचा शिलान्यास (पायाभरणी) समारंभ एकाच वेळी करण्यात आला. त्यानंतर मंदिर निर्माण कार्य वेगाने सुरू आहे हे सर्वांना ज्ञात आहेच.

या कामातील एक महत्त्वाचा टप्पा आता पूर्ण झाला आहे. माघ शुद्ध त्रयोदशी, शक १९४५; गुरुवार, दि. २२-२-२०२४ रोजी श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराजांच्या निर्माणाधीन मंदिराच्या 'उत्तरम्' शिलेचा पूजन समारंभ होऊन ती तुळई नियोजित मंदिराच्या नैऋत्य कोपऱ्यावर स्थापित करण्यात आली. बांधकामातील हा एक महत्त्वाचा टप्पा असून, भिंती आणि मंदिराचे छप्पर; तसेच कळस यांचा तोल सांभाळण्याचे काम 'उत्तरम्' करते अशी माहिती स्थपती श्री. नंदकुमार यांनी दिली. वे.मू. मंदार फडकेगुरुजी आणि श्री. अशोकराव जोशी तथा श्रीकाकामहाराज यांनी शिलेचे यथासांग पूजन केल्यावर श्री. शशीवर्धन, श्री. पेरिस्वामी, श्री. विकास अशा कुशल कारागिरांनी उत्तरम् शिलेचे पूजन केले आणि ती सुयोग्य जागेवर ठेवण्यात आली. श्रीकाकामहाराजांच्या हस्ते सर्व कामगारांना वस्त्रवाटप (शर्ट) करण्यात आले. सर्व उपस्थितांना प्रसाद वाटप करण्यात आले. मंदिरनिर्माणातील हा एक महत्त्वाचा टप्पा वेळापत्रकाप्रमाणे गाठल्याचे समाधान सर्वांनीच व्यक्त केले.



*श्री अशोकराव जोशी तथा श्रीकाकामहाराज यांच्या हस्ते 'उत्तरम्' शिलेचे पूजन*



*वे.मू. मंदार फडकेगुरुजी आणि वे.मू. मिलिंद बोरकरगुरुजी यांच्या हस्ते 'उत्तरम्' शिलेचे पूजन*



*श्री. प्रशांत सावंत, श्री. शशीवर्धन, श्री. पेरिस्वामी आदींच्या हस्ते 'उत्तरम्' शिलेचे पूजन*

# डॉ. सुचेता परांजपे यांचे व्याख्यान : 'प्राचीन भारतातील औषधांचा इतिहास'



*डॉ. सुचेता परांजपे*



*वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसमोर बोलताना डॉ. सुचेता परांजपे*

दि. २५ जानेवारी २०२४ रोजी, 'प्राचीन भारतातील औषधांचा इतिहास' या विषयावर डॉ. सुचेता परांजपे यांनी पहिल्या आणि दुसऱ्या वर्षांतील एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान दिले. डॉ. सुचेता परांजपे संस्कृत, गणित आणि तत्त्वज्ञान या विषयांच्या अभ्यासक असून त्यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून 'वैदिक वाङ्मय' या विषयात डॉक्टरेटही केली आहे. तसेच त्या संस्कृत आणि 'इंडॉलॉजी'च्या 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे'च्या माजी प्राध्यापकही आहेत. लिपूझिग युनिव्हर्सिटी, जर्मनीच्या त्या 'व्हिजिटिंग फॅकल्टी' आहेत. 'असोसिएट कॉलेज ऑफ मिडवेस्ट, शिकागो,' मध्ये त्यांनी 'इंडिया प्रोग्रॅम डायरेक्टर' म्हणूनही काम केले आहे.

डॉ. सुचेता परांजपे यांनी वैदिक आणि वैद्यक याविषयी प्राचीन स्वरूपाच्या विविध वैदिक संदर्भांबद्दल सांगितले. आपल्या प्राचीन वेदापासून 'चरक', 'सुश्रुत' अशा सर्व विषयांना स्पर्श करत भारतीय इतिहासाचे आधुनिक औषधशास्त्रातील योगदान आपल्या व्याख्यानात त्यानी अधोरेखित केले. देव-देवतांचे वैद्य अश्विनीकुमार हे विश्वातील प्रथम डॉक्टर होते असे सांगत, आपल्या संस्कृतीतील अनेक परंपरा ह्या पूर्णतः शास्त्रीय पायावर अवलंबून आहेत; असेही त्यानी संदर्भासहित स्पष्ट केले. डॉक्टर सुचेता परांजपे यांनी आपल्या पूर्वजांचे योगदान जाणून घेण्यावर भर दिला. आधुनिक विज्ञानाचे लोक सहसा याला अवैज्ञानिक म्हणतात पण भारतातील अनेक प्रथा आणि रीतिरिवाजांना शास्त्रीय आधार आहे, तो जाणून घेण्याचे आवाहन त्यांनी तरुण पिढीला केले.

प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रिता मुल्हेरकर याही व्याख्यानासाठी उपस्थित होत्या. या व्याख्यानाला प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण : Grow Joy on Your Birthday

वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा जन्मदिवस त्यांच्या हस्ते एक रोपटे लावून साजरा करण्याची नावीन्यपूर्ण कल्पना संस्थेने अंमलात आणली आहे, त्यामुळे वाढदिवस असणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक आणि वृक्षसंवर्धनचे महत्त्व असा दुहेरी हेतू साध्य होताना दिसत आहे.



*आपल्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करताना वैद्यकीय विद्यार्थी*



*वृक्षारोपणाच्या वेळी विद्यार्थ्यांसोबत डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. यादव आदी*

# डेरवण रुग्णालयात अन्ननलिकेवरील दोन अवघड शस्त्रक्रिया यशस्वी



*शस्त्रक्रियेनंतर आवडता आहार घेताना रुग्ण*

आपला भारत देश २१व्या शतकात महासत्तेच्या उंबरठ्यावर उभा असताना अजूनही कोकणातील दुर्गम भागात पैशाअभावी गरीब रुग्ण आपल्या मूलभूत आरोग्यविषयक गरजांपासून वंचित आहेत. अशा रुग्णांसाठी वालावलकर रुग्णालय वरदान आहे. शहरी मोठ्या रुग्णालयात मिळणाऱ्या सर्व अत्याधुनिक उपचारपद्धती येथे उपलब्ध आहेत. नुकताच याचा अनुभव आला.

३९ वर्षांच्या एका महिलेला गेले अनेक महिने कुठल्याही प्रकारचे जड अन्न किंवा द्रव पदार्थ गिळताना त्रास होत होता. त्या मोठ्या शहरातील अनेक रुग्णालयात फिरून आल्या होत्या पण त्यांना उपचाराचा खर्च २०-२५ हजार रुपये सांगितल्यामुळे त्या उपचार करू शकत नव्हत्या. शेवटी त्या भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात दाखल झाल्या. येथे अन्ननलिका आणि पोटाची दुर्बिणीद्वारे तपासणी करण्याच्या अत्याधुनिक सोयी उपलब्ध आहेत. मुंबईत हिंदुजा हॉस्पिटलमध्ये ३० वर्षांहूनही अधिक काळ कार्यरत असलेले डॉ. आनंद जोशी हे या विभागाचे प्रमुख आहेत. डॉक्टर जोशींनी जेव्हा सदर महिलेची दुर्बिणीद्वारे तपासणी केली, तेव्हा असे लक्षात आले की, तिच्या अन्ननलिकेमध्ये पडदा तयार झाला होता (Oesophageal web). हा अतिशय दुर्मिळ आजार आहे. डॉ. आनंद जोशींनी योग्य ती काळजी घेऊन हा पडदा दुर्बिणीद्वारे पूर्णपणे काढून टाकला. महिलेची गिळण्याची तक्रार तात्काळ बंद होऊन, सदर महिलेने त्याच दिवशी शस्त्रक्रियेनंतर २ तासांनी अन्ननलिकेला काही इजा नाही हे नक्की झाल्यावर तिच्या आवडीच्या पावभाजीचा आस्वाद घेतला. एका आठवड्यानंतर सदर महिला पुन्हा तपासणीकरिता आली तेव्हा तिने आपले वजन एक किलोने वाढल्याचे आनंदाने सांगितले!

दुसरी केस आहे ती तर फक्त १९ वर्षांच्या तरुणीची. या तरुणीची सन २०२३च्या मे महिन्यामध्ये संपूर्ण जठराचे गँगरीन झाल्याने जठर काढून टाकण्याची शस्त्रक्रिया झाली होती. तिची अन्ननलिका तिच्या लहान आतड्याला जोडण्यात आली होती. अचानक ६ फेब्रुवारीला, चुकून एका मोठ्या बोराची बी तिने गिळली व ती बी तिच्या अन्ननलिकेत अडकली. तिला काही खाता-पिता येईना. अगदी पाणीसुद्धा उलटून पडत होते. ती रुग्णालयात तात्काळ विभागात दाखल झाली. पुन्हा डॉक्टर आनंद जोशी यांनी कौशल्यपूर्ण उपचार पद्धतीने एक विशिष्ट प्रकारची जाळी (Rothnet) वापरून ही बी शिताफीने काढली व अन्ननलिका 'CRE Balloon'ने रुंदावून अन्नमार्ग मोकळा केला. दुसऱ्या दिवशी संपूर्ण जेवण घेतल्यावर तिचे मातापिता समाधानाने तिला घरी घेऊन गेले.

भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात हे उपचार अतिशय माफक दरात म्हणजे जेमतेम १०००-१५०० रुपयात करण्यात आले. भ.क.ल. वालावलकर रुग्णालय रुग्णसेवेला प्राधान्य (Patient services first), या तत्त्वावर काम करते याचेच ही उदाहरणे द्योतक आहेत.

# अमेरिकेतील डॉ. बेंजामिन यांची अंगणवाड्यांना भेट

बालकर्करोग ह्या विषयात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या अमेरिकेतील डॉ. बेंजामिन यांनी दि. १७.०२.२०२४ रोजी कुटरे, नांदगाव आणि आंबेतखोल या गावातील अंगणवाड्यांना भेट दिली आणि खेडेगावातील बालकांचे आरोग्य याविषयी माहिती करून घेतली. भ.क.ल. वालावलकर रुग्णालय देत असलेल्या आरोग्य सुविधांची माहिती सायकॉलॉजिस्ट स्वाती अणि रूपाली यांनी त्यांना त्या वेळी दिली.



*डॉ. बेंजामिन, सायकॉलॉजिस्ट स्वाती आणि रूपाली यांची अंगणवाडीला भेट सोबत अंगणवाडी सेविका आणि मुले*

# वालावलकर रुग्णालयात अवघड शस्त्रक्रिया यशस्वी



रुग्णाबरोबर डॉ. प्रतीक शहाणे (ईएनटी सर्जन), डॉ. राजीव केणी (ईएनटी सर्जन), भूलतज्ज्ञ डॉ. लीना ठाकूर, डॉ. संदीप राव आदी




स्वरयंत्रानजीक घशात अडकलेल्या माशाचे हाड

वालावलकर हॉस्पिटल, सावर्डे येथे कान, नाक व घसा विभागातर्फे स्वरयंत्राजवळ घशामध्ये अडकलेले माशाचे हाड काढण्याची अत्यंत अवघड अशी शस्त्रक्रिया दि. १५.०२.२०२४ रोजी करण्यात आली. रुग्णाच्या घशात दोन महिन्यापूर्वी माशाचे हाड अडकले होते आणि त्यानंतर त्याला गिळताना त्रास होत होता, आणि घशाला सूज येऊन अन्न गिळता येत नव्हते. चिपळूणचे डॉ. ओंकार शर्मा (ऑर्थो–पेडिक सर्जन) यांनी रुग्णाला वालावलकर हॉस्पिटलमध्ये एम.आर. आय. (MRI) व सिटी स्कॅन करण्यासाठी पाठवले. वालावलकर हॉस्पिटलमध्ये तपासणी करताना असे आढळून आले की रुग्णाच्या घशात माशाचे हाड स्वरयंत्रानजीक अडकले आहे.

डॉ. आनंद जोशी (गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजिस्ट सर्जन), सर्जरी विभागाचे डॉ. मानसिंग घाटगे (डीन), डॉ. अविनाश सुरूषे (सर्जन), डॉ. संग्राम दाभोळकर (सर्जन), ईएनटी विभागाचे डॉ. प्रतीक शहाणे (ईएनटी सर्जन) यांनी चर्चा करून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. स्वरयंत्रानजीक घशामध्ये अडकलेले माशाचे हाड काढण्याची अत्यंत अवघड अशी शस्त्रक्रिया यशस्विरीत्या कुठेही चिरफाड न करता दुर्बिणीद्वारे पार पाडून, घशात रुतलेला ४ सेंटिमीटर लांबीचा माशाच्या हाडाचा तुकडा बाहेर काढण्यात यश आले. शत्रक्रियेनंतर रुग्णाला व्यवस्थित जेवता आले. दोन महिने होत असलेल्या त्रासातून मुक्तता झाल्यामुळे रुग्णाने व त्यांच्या नातेवाइकांनी रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स व स्टाफचे आभार मानले. ही शस्त्रक्रिया कान, नाक व घसा विभागाचे तज्ज्ञ शल्यविशारद डॉ. प्रतीक शहाणे, डॉ. राजीव केणी व डॉ. सीजा यांनी उत्तमरीत्या केली. या अवघड अशा शस्त्रक्रियेसाठी भूल देण्याचे काम भूलतज्ज्ञ डॉ. लीना ठाकूर, डॉ. संदीप राव, डॉ. प्राची रबडे व डॉ. केयूर पटेल यांनी केले. वालावलकर रुग्णालयात सर्व प्रकारचे तज्ज्ञ डॉक्टर्स आणि अद्ययावत यंत्रणा एकाच छताखाली असल्यामुळे कोकणवासियांसाठी हे रुग्णालय वरदान ठरत आहे.

# मोहगनीचे रोप देऊन मुलीच्या जन्माचा उत्सव साजरा – एक नावीन्यपूर्ण उपक्रम

जेव्हा एक मुलगी जन्माला येते तेव्हा ती कुटुंबाची तीन स्तरांवर उन्नती करते. मुलीच्या जन्माने कुटुंबातील वातावरण प्रसन्न होते. मोठेपणी ती घरातील सर्व वडिलधाऱ्यांची व आरोग्याची काळजी घेते व योग्य शिक्षणाचा आधार मिळाल्यावर ती समाजातील कुटुंबाची प्रतिष्ठा उंचावते आणि म्हणूनच मुलींच्या जन्माचा उत्सव साजरा व्हायला हवा आणि तिला मोठी झाल्यावरही आर्थिक मदत मिळावी ह्या उद्देशाने संस्थेने मुलीच्या जन्मानंतर मोहगनी झाडाचे रोप मातेला देण्याचा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे.

भ.क.ल. वालावलकर हॉस्पिटलमध्ये प्रसूती झालेल्या स्त्रीला मुलगी झाली की मोहगनीचे झाड देऊन तिला त्या झाडाचे महत्त्व सांगितले जाते. मोहगनीच्या लाकडापासून बनविलेले फर्निचर हे प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जाते. मोहगनीचा वृक्ष पर्यावरणाचे रक्षण करतो. हवा शुद्ध ठेवण्यास मदत करतो, जमिनीची धूप थांबवतो, हवेचे तापमान नियंत्रित करतो. कीटकांचा मज्जाव करून आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करतो. तसेच त्याची पाने औषधांमध्ये देखील वापरली जातात. अशा प्रकारे वृक्ष संवर्धन आणि गरज पडल्यास आर्थिक मदत हे दुहेरी हेतू समोर ठेवून हे मोहगनीचे रोप मुलींच्या जन्माचा उत्सव साजरा करते आणि समाजात केंद्रबिंदू म्हणून मुलीचे स्थान बळकट करते.



डॉ. अनघा मोडक मोहगनीचे रोप देताना

# श्रीगणेश मंदिरात हळदीकुंकू समारंभाच्या माध्यमातून ‘कौशल्य विकास जागृती’




*हळदीकुंकू समारंभाला उपस्थित महिलावर्ग*



*हळदीकुंकू समारंभाला उपस्थित महिलावर्ग*

भ. क. ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयाच्या आवारात असलेल्या श्रीगणेश मंदिरात दि. १३ फेब्रुवारी २०२४ या दिवशी माघी गणपती उत्सवात सामुदायिक हळदीकुंकू सभारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रतिवर्षी संपन्न होणाऱ्या हळदीकुंकू सभारंभात या वर्षी पंचक्रोशीतील सावर्डे, पातेपिळवली, खाडोत्री, आगवे, मांडकी, असुर्डे, पालवण, गोवळकोट इत्यादी गावातील जवळजवळ १४०० महिला सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचे औचित्य साधून महिलांना स्वावलंबी होण्यासाठी SVJCT कौशल्य विकास केंद्रातर्फे विविध प्रकारच्या शोभेच्या वस्तू, तोरणे, पर्स, वॉलेट, खादीच्या पिशव्या, खणाच्या कापडाचे फाईल फोल्डर यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आणि महिलांना व तरुणींना प्रशिक्षण घेण्याकरता प्रोत्साहित केले गेले





*कौशल्य विकास केंद्राच्या विविध कलावस्तूंना उपस्थित महिलांचा उत्सुक प्रतिसाद*

# मुंबई येथील प्रणोती म्हात्रे यांची ‘कौशल्य विकास केंद्रा’त फॅशन डिझायनिंग कार्यशाळा





*मुंबईच्या नामांकित फॅशन डिझायनर ‘प्रतिती डिझाइन हाऊस’च्या प्रणोती म्हात्रे यांनी दि. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी कौशल्य विकास केंद्राला भेट देऊन विद्यार्थिनींना उपयुक्त असे मार्गदर्शन केले*

# डेरवण एनर्जिया फुटबॉल स्पर्धेत 'अनंतपूर स्पोर्ट्स ॲकॅडमी' अजिंक्य



*अंतिम सामन्यातील नाणेफेक करताना श्री. सुधाकर जाधव, सोबत श्री. माधवराव काजरेकर आणि अन्य*

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. ६ ते ९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत डेरवण एनर्जिया फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १७ वर्षांखालील फक्त मुलींसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत एकूण १६ संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेसाठी आंध्रप्रदेश, गोवा, कर्नाटक, झारखंड या राज्यांमधून तसेच मुंबई, कोल्हापूर, पुणे येथून संघ सहभागी झाले होते.

लीग पद्धतीने खेळविण्यात आलेल्या या स्पर्धेत आंध्रप्रदेशच्या अनंतपूर स्पोर्ट्स ॲकॅडमी संघाने वर्चस्व नोंदवले. उपांत्य फेरीतील झालेल्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात अनंतपूर स्पोर्ट्स ॲकॅडमी संघाने युवा क्लब रांची, झारखंड या संघाचा २-१ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली. संघातील नंदिनी हिला उत्कृष्ठ सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. तसेच उपांत्य फेरीतील दुसऱ्या सामन्यात 'ॲस्पायर, कोल्हापूर' संघाने 'युकेएम, पुणे' या संघावर २-० अशा फरकाने गोल करून अंतिम फेरीत आपले नाव कोरले. श्वेता या खेळाडूला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. तसेच तृतीय क्रमांकासाठी घेण्यात आलेल्या 'युवा क्लब, रांची' विरुद्ध 'युकेएम, पुणे' यांच्यामध्ये झालेल्या चुरशीच्या सामन्यामध्ये युवा क्लबने १-० ची आघाडी घेऊन विजय मिळविला व तृतीय पारितोषिक जिंकले.

अंतिम लढतीत अनंतपूर स्पोर्ट्स ॲकॅडमी, आंध्रप्रदेश विरुद्ध ॲस्पायर कोल्हापूर या संघांमध्ये झालेल्या रोमांचकारी सामन्यात अनंतपूर स्पोर्ट्स ॲकॅडमी, आंध्रप्रदेश हा संघ २-० या फरकाने अजिंक्यपदाचा मानकरी ठरला. विजेत्या संघाला रु. ५०,०००/- , उपविजेत्या संघाला रु. ४०,०००/- आणि तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या संघाला रु. २५,०००/- रोख पारितोषिक आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच अनंतपूर स्पोर्ट्स ॲकॅडमी संघातील चंचला कुमारी - उत्कृष्ट गोलरक्षक आणि युवा क्लब स्पोर्ट्स रांची, झारखंड संघातील खेळाडू सई वर्षीठा - गोल्डन बूट चषकाच्या मानकरी ठरल्या.

स्पर्धेच्या परितोषिक वितरण समारंभाप्रसंगी 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'चे विश्वस्त विकासराव वालावलकर, सुधाकर जाधव, माधवराव काजरेकर, संदीप तावडे, प्रसाद परांजपे, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे तांत्रिक समिती आणि पंचप्रमुख धनराज मोरे आदि मान्यवर उपस्थित होते.



*उपविजेता 'ॲस्पायर, कोल्हापूर' संघ पारितोषिक स्वीकारताना*



*तृतीय क्रमांक विजेता संघ 'युवा क्लब, रांची' श्री. विकास वालावलकर यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना*





*स्पर्धेतील विजेता संघ 'अनंतपूर स्पोर्ट्स अकॅडमी, आंध्र प्रदेश' श्री. विकास वालावलकर यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना*

# समाज कल्याण विभागाच्या क्रीडा स्पर्धा संपन्न



*उद्‌घाटनप्रसंगी खेळाडूंची मानवंदना स्वीकारताना मान्यवर*



*क्रीडा शपथ घेताना खेळाडू*

समाज कल्याण विभाग आयोजित मुंबई विभागीय क्रीडा स्पर्धा दि. ३० व ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई शहर, मुंबई उपनगर या जिल्ह्यांमधून एकूण ३६० खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेत ॲथलेटिक्स, कबड्डी, खो-खो, कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन व टेबल टेनिस अशा सांघिक व वैयक्तिक स्पर्धांमध्ये खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावले.

स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी वंदना कोचुरे - प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण मुंबई विभाग, प्रसाद खैरनार - सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई, समाधान इंगळे - सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड आणि संतोष चिकणे - सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण रत्नागिरी व सिंधुदुर्ग, ज्येष्ठ क्रीडा संघटक संदीप तावडे, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर आदी मान्यवर उपस्थित होते. समाज कल्याण विभागातर्फे पहिल्यांदाच क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, त्यासाठी एसव्हीजेसीटीने आपले आंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान विनामूल्य उपलब्ध करून दिले, यासाठी संस्थेचे विशेष आभार असे संतोष चिकणे यांनी आवर्जून नमूद केले.

मुलांच्या कबड्डी स्पर्धेत रायगड विरुद्ध सिंधुदुर्ग या अंतिम सामन्यात रायगड संघाने सिंधुदुर्ग संघावर विजय मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच रत्नागिरी संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. मुलींसाठीच्या कबड्डीच्या रत्नागिरी विरुद्ध सिंधुदुर्ग या अंतिम सामन्यात रत्नागिरी या संघाने सिंधुदुर्ग संघावर विजय मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच मुंबई शहर या संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. मुलांच्या खोखो स्पर्धेत रत्नागिरी विरुद्ध मुंबई उपनगर या अंतिम सामन्यात रत्नागिरी संघाने मुंबई उपनगर संघावर विजय मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच ठाणे संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. मुलींच्या खो खोच्या रत्नागिरी विरुद्ध रायगड या अंतिम सामन्यात रत्नागिरी संघाने रायगड संघावर विजय मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच सिंधुदुर्ग या संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलांच्या रत्नागिरी विरुद्ध मुंबई उपनगर या चुरशीच्या अंतिम सामन्यात रत्नागिरी संघाने मुंबई उपनगर संघावर विजय मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच रायगड संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

वैयक्तिक स्पर्धेत ॲथलेटिक्स खेळामध्ये रत्नागिरी - प्रथम क्रमांक, रायगड - द्वितीय क्रमांक आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याने तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. त्याचबरोबर टेबल टेनिस स्पर्धेत मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि रत्नागिरी ह्या जिल्ह्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच बॅडमिंटन स्पर्धेत रायगड, मुंबई शहर, मुंबई उपनगर हे जिल्हे पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी ठरले. कॅरम स्पर्धेत मुंबई शहर - प्रथम, मुंबई उपनगर - द्वितीय तर रायगड जिल्ह्याने तृतीय क्रमांक पटकाविला. बुद्धिबळ स्पर्धेत रायगड, मुंबई उपनगर आणि रत्नागिरी हे तीन जिल्हे अनुक्रमे प्रथम तीन क्रमांकांचे मानकरी ठरले.

या सर्व स्पर्धेतील सांघिक व वैयक्तिक खेळांमध्ये रत्नागिरी जिल्हा इतर जिल्ह्यांपेक्षा जास्त गुण मिळवून मुंबई विभागीय क्रीडा-स्पर्धेतील विजेता जिल्हा ठरला. बक्षीस वितरण समारंभप्रसंगी खेळाडूंना प्रमाणपत्रे व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.



*सामन्यातील एक रंगतदार क्षण*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# डेरवण युथ गेम्स दि. २१ मार्च २०२४ पासून

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आयोजित शिवजयंतीनिमित्त होणाऱ्या दहाव्या डेरवण युथ गेम्सचे दि. २१ मार्च ते २८ मार्च २०२४ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

डेरवण येथील क्रीडासंकुलात १८ खेळांच्या स्पर्धांसाठी जय्यत तयारी सुरू झाली आहे. या स्पर्धेमध्ये ॲथलेटिक्स, जिम्नॅस्टिक, बॅडमिंटन, टेबलटेनिस, जलतरण, तिरंदाजी, नेमबाजी, बुद्धिबळ, कॅरम, देशी खेळांना प्रोत्साहन देण्याकरिता कबड्डी, खो-खो, लंगडी, मल्लखांब, योग या वैयक्तिक खेळांसह फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल या खेळांचा समावेश आहे. त्याचबरोबर ऑलिम्पिकमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या वॉल क्लाइम्बिंग या साहसी खेळाचीही स्पर्धा पाहण्यास मिळणार आहे.

भारतीय खेळ आणि ऑलिम्पिक खेळांचा संगम असणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील आठ हजारापेक्षा अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. यंदाही विजेत्यांना पदके, चषक आणि रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. १०५० पदके आणि १११ करंडक या स्पर्धेत खेळाडूंना बक्षीसरूपाने देण्यात येणार आहे. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेण्याचे निश्चित केले आहे. विविध क्रीडा प्रकारात राज्यातील खेळाडूंचा चित्तथरारक खेळ या स्पर्धेनिमित्त पाहण्याची पर्वणी मिळणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन दि. २१ मार्च रोजी रोइंगमधील 'ध्यानचंद पुरस्कार'प्राप्त ज्येष्ठ खेळाडू स्मिता शिरोळे-यादव यांच्या उपस्थितीमध्ये पार पडणार आहे व स्पर्धेचा समारोप समारंभ दि. २८ मार्चला 'महाराष्ट्र जिम्नॅस्टिक असोसिएशन'चे अध्यक्ष संजय शेट्ये यांच्या उपस्थितीमध्ये पार पडणार आहे.

स्पर्धेच्या अनुषंगाने क्रीडा मानसतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ तसेच प्रशिक्षक, राष्ट्रीय खेळाडू यांचा परिसंवाद व मुलाखतींचा कार्यक्रमही आयोजित केला जाणार आहे. या स्पर्धेत ८ वर्षांखालील ते १८ वर्षांखालील खेळाडू सहभागी होणार आहेत. दि. २० मार्चपर्यंत नोंदणी सुरू राहणार असून ऑनलाईन नोंदणी
**www.svjctsportsacademy.com**
या वेबसाईटवर सुरू झाली आहे. स्पर्धेच्या नोंदणीसाठी ९८२२६३९३०६/८८०५२२८९२२/९८५०८८३२८३/९३२५४४९२०१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.






**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवरबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील–९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव–९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर–९५८८४ ७९२२०

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035